नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०४/२०२४ (शनिवार) सकाळ

## पोलीस ठरले देवदूत

पोस्टे कुही अंतर्गत अवकाळी पावसानंतर अचानक तापमानात वाढ झाली असून तापमान 41 पर्यंत पोहचला आहे. शुक्रवारी निवडणुकीची पेट्रोलिंग सुरु असताना रस्त्याकडेला बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या एका व्यक्तीस कुही पोलिसांनी तत्काळ दवाखान्यात भरती करत त्याचे प्राण वाचविले आहे.

Ips दीपक अग्रवाल आपल्या चमुसह निवडणूक पेट्रोलिंग करत असताना भोजापूर नजीक मुख्य रस्त्याच्या कडेला किन्ही येथील भोजराज कोकाटे नामक इसम बेशुद्ध स्थितीत दिसून आला. तत्काळ कुही पोलिसांनी माणुसकी दाखवत त्या इसमास कुही येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. विशेष म्हणजे वेळेवर उपचार मिळाल्याने रुग्णाचे प्राण वाचले असून कुही पोलिसांच्या या कृतीचे सर्वच स्तरांवरून कौतुक होत आहे. यावेळी हिवराज लांजेवार, भूमेश्वर भेंडारकर, विठ्ठल लिंबेकर, दर्शन पाटील आदी पोलीस पेट्रोलिंग दरम्यान उपस्थित होते.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर